# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (लेखा व वित्त विभाग)

क्रमांक :– २९७/ प्रलेविअ / 2013 दिनांक : ९/ 12/ 2013

**परिपत्रक**

आवक 6726 दिनांक 12.12.13 महानगरपालिका नागपूर

प्रति,

1) सर्व विभाग प्रमुख,
   महानगरपालिका, नागपूर
2) सहाय्यक आयुक्त ( सर्व झोन )
   महानगरपालिका, नागपूर

**विषय:–** आपल्या विभागामार्फत विद्युत वापराची देयके मंजूरीस्तव वित्त विभागास सादर करतांना घ्यावयाच्या दक्षतेबाबत

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपल्या विभाग/झोन अंतर्गत विद्युत वापराची देयक वित्त विभागास मंजूरीसाठी सादर केलेल्या देयकांची पडताळणी करण्यात आली असता बहुतांशी देयकांमध्ये खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेली आहे.

1. वित्त विभागाव्दारे आपल्या विभागास/झोनला वारंवार सुचना देऊनही आकस्मीक खर्चाच्या देयकांवर 12 अंकी नवीन अर्थसंकल्पीय व्यय पद ( 12 DIGIT ) पद क्रमांक नमूद करण्यात येत नाही किंवा जूना व्यय पद क्र. नमूद करण्यात येतो.
2. आपल्या विभाग/झोन मार्फत आकस्मीक खर्चाचे देयकांवर Payable to या ठिकाणी ज्या एजन्सी ला रक्कम अदा करावयाची आहे त्याचे नाव नमूद न करता शाळेचे/ग्रंथालयाचे/शाखेचे नाव नमूद करण्यात येते किंवा एजन्सी चे नाव चुकीचे नमूद करण्यात येते उदा. स्पॅनको NSD Ltd/MSEDCL यांचे नावाने धनादेश निर्गमित करणेबाबत विद्युत देयकांवर स्पष्टपणे उल्लेख केलेला असतांना काही प्रकरणात मराविम असे नमूद करण्यात येते.
3. विद्युत देयके वित्त विभागास मुदतीच्या आत सादर करण्यात येत नाही त्यामुळे एजन्सीकडून दंडाची आकारणी करण्यात येते व त्याचा आर्थिक भुर्दंड मनपा वर बसतो.
4. काही प्रमाणात सरासरीपेक्षा जास्त व अवास्तव विद्युत वापर झालेला असल्याचे आढळून येते याबाबत कोणतीही चौकशी न करता देयके मंजूरीसाठी वित्त विभागास सादर करण्यात येतात.

Asstt. Supdt. Pl. Circulate All Concerned School Insp./HM
Edu. Off. 12/12/13



P.T.O.

5. आकस्मीक खर्चासोबत जोडलेले विद्युत देयक प्रदानार्थ मंजूर करून आकस्मीक खर्चाचे देयकांसोबत जोडणे आवश्यक आहे. परंतू ( Pass for Payment ) प्रदानार्थ मंजूर न करता सादर करण्यात येतात.

6. आकस्मीक खर्चासोबत जोडलेल्या विद्युत देयकांवर खालीलप्रमाणे प्रमाणपत्र नोंदविण्यात येत नाही.

" <u>देयकात नमूद विद्युत वापर कार्यालयीन कामासाठी झालेला असून देयकाची नोंद विद्युत वापर नोंदवहीत पृष्ठ क्र. वर घेण्यात आलेली आहे."</u> 'A'

विद्युत देयकामध्ये उपरोक्त प्रकारच्या अनियमितता असतांना देखील देयके परत केल्यास समय मर्यादे चे उल्लंघन होऊन महानगरपालिकेला आर्थिक भुर्दंड किंवा विद्युत कपात इ कार्यवाही टाळणेकरीता विशेष बाब म्हणून सदर देयके वित्त विभागाकडून पारित करण्यात येतात. **<u>तरी सर्व विभाग प्रमुख/सहाय्यक आयुक्त सर्व झोन यांना कळविण्यात येते की वित्त विभागास विद्युत देयके सादर करतांना उपरोक्त बाबींचे संदर्भात पडताळणी व उपरोक्त नमूद सर्व अनियमिंतता यांची पूर्तता करण्यात येऊनच देयके वित्त विभागास सादर करण्यात यावी.</u>** विद्युत देयकामधील अनियमितते संदर्भात लेखा आक्षेप/इतर प्रशासकीय अडचणी उद्भवल्यास याबाबतची संपूर्ण जबाबदारी देयके शिफारसीसह मंजूरीसाठी सादर करणा--या संबंधीत आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील याची नोंद घेण्यात यावी.

**<u>वर नमूद परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.</u>**

(सही)

**प्रमुख लेखा व वित्त अधिकारी**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलीपी :--**

1) मा. आयुक्त, म.न.पा. नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर
2) मा. अप्पर आयुक्त, म.न.पा. नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर.
3) मा. उपायुक्त ( I ) व ( II ) म.न.पा.नागपूर यांना माहितीकरीता सादर.
4) मा. अति. उपायुक्त ( I ) व ( II ) म.न.पा.नागपूर यांना माहितीकरीता सादर.
5) मा. अधिक्षक अभियंता ( लोककर्म ), म.न.पा. नागपूर यांना माहितीकरीता सादर.
6) लेखा अधिकारी / निगम लेखापरिक्षक, वित्त विभाग, म.न.पा. नागपूर
7) सर्व ऑडीट क्लर्क्स, वित्त विभाग, म.न.पा. नागपूर यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाही करीता.

(सही)

**प्रमुख लेखा व वित्त अधिकारी**
**महानगरपालिका, नागपूर**

प्रत : माहितिस्तव व कार्यवाहीस्तव अग्रेषीत
मु.अ. सर्व प्राथ. व माध्यमिक शाळा,
म न पा नागपूर

(सही)
13.12.13
E.O.(NMC).